शिपाई, हवालदारांनाही तपासाचे अधिकार

राज्य सरकारच्या गृह विभागाचा निर्णय

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यात गुन्हेगारीमध्ये वाढ होत असल्याने अतिरिक्त कामाचा भार वाढून पोलिसांवरील ताण-तणाव वाढतच आहे. तपास अधिकाऱ्यांवर असलेला गुन्ह्यांचा बोजा आणि अपुऱ्या पोलिस मनुष्यबळाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या गृहखात्याने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे पोलिस ठाण्यातील हवालदार आणि शिपायांनाही गुन्ह्यांचा तपास करता येणार आहे. यापूर्वी, केवळ पोलिस नाईक ते पोलिस उपनिरीक्षक पदापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हा अधिकार होता. हा अधिकार देताना हवालदारांची निवड करताना निकषही घालून दिले आहेत. मात्र या निर्णयामुळे पोलिस अधिकाऱ्यांवरील ताण नक्कीच कमी होणार आहे.

शहरी भागात पोलिसांचे अपुरे मनुष्यबळ जरी असले तरी अधिकाऱ्यांची संख्या ही पुरेशी आहे. त्यामुळे गुन्ह्यांचा तपास हा पोलिस उपनिरीक्षकपदापासून वरील अधिकाऱ्यांकडे दिला जातो. मात्र, ग्रामीण भागात अपुऱ्या मनुष्यबळाबरोबर अधिकाऱ्यांची संख्याही कमी आहे. पोलिसांवर कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्ह्यांची उकल करणे हे दुहेरी काम असते. त्यातच बंदोबस्तात अडकल्याने गुन्ह्यांच्या तपासावरही परिणाम होत असतो. दुसरकीडे एकाच अधिकाऱ्याकडे अनेक गुन्ह्यांचा तपास दिल्याने अधिकाऱ्यांवरील ताणही वाढत असून त्याचा विपरित परिणाम गुन्हे उकल आणि दोषसिध्दीवरही होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यातच आता पोलिस दलात हवालदार पातळीवरही उच्चशिक्षित तरुण भरती होत असून त्यांच्याकडे छोट्या गुन्ह्यांचा तपास देण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. ज्यामुळे अधिकाऱ्यांवरील ताण काही प्रमाणात कमी होईल, आणि गुन्हे उकलीचा आलेखही वाढेल, असा विश्वास गृह खात्याला आहे.

पोलिस शिपायांना तपास देतानाचे निकष

- पदवीधारक असावा
- पोलिस शिपाई म्हणून सेवेची सात वर्षे पूर्ण केलेली असावी
- गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथील सहा आठवड्याचे विशेष प्रशिक्षण पूर्ण व परीक्षा उत्तीर्ण असणे
- कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी

भाजप-'उबाठा'मध्ये 'देवनार'वरून खडाजंगी

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

देवनार डम्पिंग ग्राउंडमधील १२४ एकर जमीन धारावी पुनर्विकासासाठी देताना या ग्राउंडमधील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून ही जागा तीन वर्षांत रिकामी केली जाणार आहे. त्यासाठी मुंबई महापालिका २ हजार ३६८ कोटी रुपये खर्च करणार आहे. यावरून शिवसेना उबाठा आणि भाजप समोरासमोर उभे ठाकले आहेत.

शिवसेना उबाठा पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबई महापालिकेवर केलेल्या टीकेला भाजपचे मुंबई अध्यक्ष आणि राज्याचे मंत्री आशीष शेलार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. 'देवनार डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी खर्च होणारी रक्कम अधिक की पूर्वी काढण्यात आलेली साडेचार हजार कोटी रुपयांची रक्कम मोठी,' असा प्रश्न त्यांनी एक्सवर उपस्थित केला आहे.

'अदानीने ओरबाडलेल्या जागेच्या स्वच्छतेसाठी मुंबईकरांना पैसे भरायला का लावताय,' असा प्रश्न मुंबई महापालिकेच्या निविदेवर आदित्य ठाकरे यांनी उपस्थित करत राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेवर टीका केली होती. 'कचरा संकलन व वापरकर्ता शुल्काच्या स्वरूपात महापालिका कर वसूल करत असल्याचे' आदित्य यांनी समाजमाध्यमांवर म्हटले होते.

'आदित्य ठाकरे यांच्या पक्षाची मुंबई महापालिकेत २००८मध्ये सत्ता असताना देवनार डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी ४,५०० कोटींची निविदा काढण्यात आली होती. आत्तापर्यंत हे काम पूर्ण करणे अपेक्षित होते. हा निधी वाया जाणार ही बाब आम्ही उघड केली होती,' असेही शेलार म्हणाले.

कंत्राटाचा हिशेब कोण देणार?

'तुमच्या पक्षाने यापूर्वी ४,५०० कोटी रुपयांचे कंत्राट दिले त्याचा हिशेब कोण देणार,' असा प्रश्न त्यांनी उपस्थित करत आशीष शेलार यांनी शिवसेना उबाठा पक्षावर टीका केली.

'जनगणनेचा कार्यक्रम जाहीर करा'

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या जातनिहाय जनगणनेचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्याची मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी मुंबईत पत्रकार परिषदेत केली. तर यासाठी तेलंगण व कर्नाटक पॅटर्न राबवावा, असे आवाहनही त्यांनी केले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

'जातनिहाय जनगणना ही केवळ शिरगणती नाही तर सामाजिक अजेंडा आहे. महाराष्ट्रात ओबीसींचे प्रमाण २७ वरून ६४ टक्क्यापर्यंत जाऊ शकते. या जनगणनेमुळे प्रत्येक समाजघटकाची लोकसंख्या किती हेही समजेल, पाटीदार, गुर्जर, मराठा आरक्षणाचा प्रश्नही यामुळे सुटण्यास मदत होईल. भाजप सरकारला जातनिहाय जनगणनेचा निर्णय घ्यावा लागला याचे सर्व श्रेय राहुल गांधी यांना जाते, त्यांनी या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला त्यामुळे मोदी सरकारला निर्णय घ्यावा लागला,' असे ते म्हणाले.

'विजय शहांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा'

कर्नल सोफिया यांच्याबद्दल अत्यंत घाणेरडी भाषा वापरणारे भाजपचे मध्य प्रदेशातील मंत्री विजय शहा यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही सपकाळ यांनी केली.

ayushakti
since 1987



अग्निकर्म उपचाराने वेदना मुक्त जीवन जगा!

मोफत अग्निकर्म थेरपी

- तुम्ही तीव्र वेदनांनी जगून कंटाळला आहात का?
- नैसर्गिक, प्रभावी आणि वेदनारहित उपाय शोधत आहात?
- आमच्या अग्निकर्म एक दिवसाच्या मोफत ऑफर चा लाभ घ्या!

अग्निकर्म म्हणजे काय?
अग्निकर्म, हे एक प्राचीन उपचार आहे जे नियंत्रित उष्ण शक्तीचा वापर करून स्नायूंच्या विविध स्थिती, सांधेदुखी आणि स्पोर्ट्स इंज्युरी दूर करण्यासाठी कार्य करते. आमचे तज्ज्ञ वैद्य ही प्राचीन पद्धत वेदनांच्या उगमस्थानावर लक्ष्य करण्यासाठी, उपचार आणि आराम यांना प्रोत्साहन देण्यासाठी वापरतात.

अग्निकर्म का निवडावे?
अग्निकर्म, एक आयुर्वेदिक थेरपी ज्यामध्ये समाविष्ट आहे: नियंत्रित उष्णता वापर, विविध वेदनांच्या परिस्थितीसाठी प्रभावी आहे.

स्नायू आणि सांधेदुखी: संधिवात, टेंडोनिटिस आणि स्नायूदुखी साठी
मज्जातंतुवेदना: तीव्र मज्जातंतू वेदना कमी करते.
सायटिका: सायटेटिक मज्जातंतूच्या वेदनापासून आराम.
तीव्र वेदना: तीव्र स्थितीसाठी नैसर्गिक वेदना आराम देते.
जळजळ: बर्साइटिस, टेंडिनाइटिस आणि इतर विकारामध्ये जळजळ कमी करते.
जखम बारी करणे: ऊतींच्या पुनरुत्पादनास प्रोत्साहन देते आणि न बरे होणारे अल्सर बरे करते.

मर्यादित स्लॉट उपलब्ध!

आत्ताच तुमच्या मोफत अग्निकर्म थेरपी सत्राची बुकिंग करा आणि वेदनामुक्त जीवनाकडे एक पाऊल टाका.

तारीख: १६ मे २०२५ / शुक्रवार
वेळ: सकाळी ११ ते रात्री ०८ वाजेपर्यंत सर्व केंद्रावर

आयुशक्ती आयुर्वेद आरोग्य केंद्र:
मालाड, विलेपार्ले, ठाणे, घाटकोपर, दादर, मीरारोड, कोपरखैरणे, खारघर, केम्प्स कॉर्नर, गोरेगाव, बोरिवली, कल्याण, मुलुंड, डोंबिवली, अंधेरी, कोलाबा, खार रोड, चेंबूर, वसई, ठाणे घोडबंदर, नाशिक, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, सुरत, मगरपट्टा (पुणे), नोएडा, सांगली

आजच तुमची जागा आरक्षित करण्यासाठी! १८०० २६६ ३००१ वर कॉल करा किंवा info@ayushakti.com वर ईमेल करा

'निसर्गसंपन्न वृद्धाश्रमात वृद्धांचे आयुष्य वाढेल'

म. टा. वृत्तसेवा, चिपळूण

निसर्गसंपन्न असणाऱ्या वृद्धाश्रमात येणाऱ्या वृद्धांचे आयुर्मान पाच-दहा वर्षांनी वाढेल. वयस्कर लोकांच्या समस्या, त्या संदर्भातील उपाययोजना, त्यांच्याकरिता काय व्यवस्था केल्या पाहिजेत, या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.

मंडणगड तालुक्यातील टाकेडे येथील मिलन वृद्धाश्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गुरुवारी झाले. यावेळी माहिती व तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशीष शेलार, राज्यमंत्री योगेश कदम, खासदार सुनील तटकरे, आमदार प्रसाद लाड, माजी आमदार भाई जगताप, डॉ. विनय नातू, डॉ. जलिल पारकर आदी उपस्थित होते.

'एखाद्या कार्यक्रमात गेल्यानंतर आनंदही व्हावा आणि खंतही वाटावी अशा प्रकारचे काही कार्यक्रम असतात. आनंद याकरिता की डॉक्टर जलिल पारकर यांनी अतिशय सुंदर, महाराष्ट्रातील पहिल्या चार-पाच वृद्धाश्रमात ज्याची आपण गणना करू शकतो, असा वृद्धाश्रम या ठिकाणी उभारला. खंत याची की आपल्या समाज व्यवस्थेमध्ये अलीकडच्या काळामध्ये परिवार लहान झाले, अडचणी वाढल्या. काही प्रमाणात कौटुंबिक ओलावादेखील कमी झाला आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृद्धाश्रमांची गरज पडायला लागली,' असे मुख्यमंत्री म्हणाले.

पुढच्या २० वर्षांत आपले सरासरी वय हे ८५ वर्ष होणार आहे. वयस्कर लोकांच्या समस्या, त्या संदर्भातील उपाययोजना, त्यांच्याकरिता काय व्यवस्था केल्या पाहिजेत या सगळ्या गोष्टींचा विचार करावा लागेल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

वृद्धांना मोठा आधार

'आमच्याकडे जे वृद्धाश्रम आहेत तिथे काहीवेळा इतकी वाईट परिस्थिती असते की जेव्हा एखाद्या वृद्धाचा मृत्यू होतो तेव्हा त्यांच्यावर अंत्यसंस्कार करायलाही कुटुंबातील कोणी येत नाही. डॉक्टर पारकर यांनी माझ्या मतदारसंघांमध्ये हा वृद्धाश्रम सुरू करून वृद्धांना आधार दिला आहे,' असे योगेश कदम म्हणाले.

मंडणगड येथे डॉ. पारकर यांनी उभारला वृद्धाश्रम

VINATI ORGANICS LIMITED

Regd. Office : B-12 & B-13/1, MIDC Indl. Area, Mahad - 402 309, Dist. Raigad, Maharashtra.
Corp. Office: Parinee Crescenzo, 1102, 11th Floor, "G" Block, Plot No. C38 & C39, Behind MCA, BKC, Bandra (E), Mumbai – 51.
Phone - +91-22-61240444/28, Fax - +91-22-61240438
CIN - L24116MH1989PLC052224, Email - shares@vinatiorganics.com, Website - www.vinatiorganics.com

Extract of Consolidated Audited Financial Results For the Quarter and Year Ended March 31, 2025

(₹ in Crores, Except EPS)

	Particulars	Quarter Ended		Year Ended	
		31.03.2025	31.03.2024	31.03.2025	31.03.2024
		Audited			
1.	Total income from operations	648.46	550.31	2,248.17	1,899.96
2.	Net profit / (loss) for the period before tax	163.90	139.13	536.18	431.97
3.	Net profit / (loss) for the period after tax	123.04	104.15	405.25	322.98
4.	Total Comprehensive Income for the period (Comprising Profit for the period after tax and other comprehensive income after tax)	123.09	104.01	404.92	322.45
5.	Paid up Equity share capital	10.37	10.37	10.37	10.37
6.	Earnings per share (before extraordinary items) (of ₹ 1/- each)				
	Basic	11.87	10.05	39.09	31.15
	Diluted	11.87	10.05	39.09	31.15
7.	Earnings per share (after extraordinary items) (of ₹ 1/- each)				
	Basic	11.87	10.05	39.09	31.15
	Diluted	11.87	10.05	39.09	31.15

Reserves (excluding Revaluation Reserve) as on 31st March, 2025 is ₹ 2782.91 Crore.

Notes:

The above is an extract of the detailed format of Financial Results for the quarter and year ended 31.03.2025 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results are available on the websites of BSE and NSE at www.bseindia.com and www.nseindia.com respectively and on Company's website at www.vinatiorganics.com.

Key numbers of Standalone Audited Financial Results:

(₹ in Crores)

	Particulars	Quarter Ended		Year Ended	
		31.03.2025	31.03.2024	31.03.2025	31.03.2024
		Audited			
1.	Revenue from operations	648.45	550.31	2,248.10	1,899.98
2.	Profit before tax	169.37	139.57	548.23	432.47
3.	Net Profit after tax	127.57	104.49	415.23	323.38

The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meetings held on 15/05/2025.

SCAN ME

Place : Mumbai
Date : 15/05/2025

For Vinati Organics Limited
Sd/-
Vinati Saraf Mutreja
Managing Director & CEO
DIN : 00079184

लुपिन लिमिटेड

LUPIN

नोंदणीकृत कार्यालय : ३रा मजला, कल्पतरु इन्स्पायर,
पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५.
कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L24100MH1983PLC029442
दूर.: (९१-२२) ६६४० २३२३ ईमेल: info@lupin.com वेबसाइट: www.lupin.com

३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरीक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा सार

(₹ दशलक्षांत)

तपशील	३१/०३/२०२५ ला संपलेली तिमाही (लेखापरिक्षित) (टीप ३ पहा)	३१/१२/२०२४ ला संपलेली तिमाही (अलेखापरिक्षित)	३१/०३/२०२४ ला संपलेली तिमाही (लेखापरिक्षित) (टीप ३ पहा)	३१/०३/२०२५ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित)	३१/०३/२०२४ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित)
१) प्रचलातून एकूण महसूल	५६,६७१.३	५७,६७७.१	४९,६०७.९	२२७,०७९.०	२००,१०८.२
२) करापूर्वी कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा)(अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपूर्वी आणि नंतर)	८,९५८.४	१०,७१२.७	४,९७७.१	४०,१५०.०	२४,२२२.७
३) करानंतरच्या कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा)(अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतर)	७,८२३.८	८,५८८.६	३,६८२.२	३३,०६२.६	१९,३५५.७
४) कंपनीच्या मालकांना देय असलेल्या करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा)	७,७२५.२	८,५५१.६	३,५९४.३	३२,८१६.२	१९,१४४.८
५) कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता (करानंतर) नफा/(तोटा) आणि इतर व्यापक उत्पन्न/(तोटा) (करा नंतर) समाविष्ट]	७,९४८.६	७,३६५.९	३,३३५.०	३१,९०१.९	१९,५५१.८
६) भरलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ २/- प्रत्येकी)	९१३.२	९१२.५	९११.४	९१३.२	९११.४
७) इतर इक्विटी (लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे)	-	-	-	१७१,१२१.८	१४१,९९१.५
८) प्रति शेअर मिळकत (दर्शनी मूल्य ₹ २/- प्रत्येकी) (तिमाही साठी वार्षिक नाही)					
अ) बेसिक (₹ मध्ये)	१६.९३	१८.७५	७.८९	७१.९५	४२.०५
ब) डायल्युटेड (₹ मध्ये):	१६.८७	१८.६९	७.८६	७१.६९	४१.८७

टिप्पणी :

१. एकल (Standalone) वित्तीय निष्कर्षांची प्रमुख संख्या खालीलप्रमाणे आहेत:

(₹ दशलक्षांत)

तपशील	३१/०३/२०२५ ला संपलेली तिमाही (लेखापरिक्षित)	३१/१२/२०२४ ला संपलेली तिमाही (अलेखापरिक्षित)	३१/०३/२०२४ ला संपलेली तिमाही (लेखापरिक्षित)	३१/०३/२०२५ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित)	३१/०३/२०२४ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित)
प्रचलातून एकूण महसूल	४४,८५६.७	४२,०८०.०	३३,९५८.८	१६९,६७५.०	१४६,६६५.०
करापूर्वी नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींपूर्वी)	१५,५३०.९	१२,९४२.८	४,२८१.६	४९,१४३.४	२७,८४६.९
करापूर्वी नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१५,५३०.९	१२,१७०.६	४,२८१.६	४८,३७१.२	२७,८४६.९
करानंतर नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१२,९१३.५	९,८४६.७	३,८४०.८	३९,७२९.६	२३,२६०.९

२. उपरोक्त निष्कर्षांचे लेखा समितीद्वारे पुनरावलोकन केले गेले आहे आणि त्यानंतर संचालक मंडळाने १४ मे, २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आणि रेकॉर्डवर घेतले आहे.

३. ३१ मार्च २०२५ आणि ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीची आकडेवारी हे संपूर्ण वित्तीय वर्षाच्या संदर्भातील लेखापरीक्षित आकडेवारी आहे आणि अनुक्रमे ३१ डिसेंबर २०२४ आणि ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतच्या अलेखापरिक्षित प्रकाशित वर्षापासून आजपर्यंतच्या आकडेवारीमधील संतुलन साधणारी आकडेवारी आहे.

४. उपरोक्त हे ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेस सोबत फाईल केलेल्या एकल (Standalone) आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार स्वरुपाचा सारांश आहे. उक्त वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण स्वरुप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट्स, www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.lupin.com/investors/reports-filings/ वर उपलब्ध आहेत. खालील क्यूआर कोड स्कॅन करून ते मिळवता येतील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४ मे, २०२५

मंडळाच्या आदेशान्वये
लुपिन लिमिटेड करिता

निलेश डी. गुप्ता
व्यवस्थापकीय संचालक
DIN: 01734642